# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

११, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०-२५६३०२३५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

क्रमांक :झोपुप्रा/प्रशा/कामवा/२०१६/प्रशा/१६६१ दिनांक : ०५/१०/२०१६.

विषय :- झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती निर्णय घेणेची कार्यपद्धती.
संदर्भ :- या कार्यालयाकडील कार्यालयीन परिपत्रक क्र.१८०, दि.०१/०६/२०१६.

**कार्यालयीन आदेश क्र. :- १९०**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भाधिन परिपत्रकान्वये झोपडपट्टी पुनर्वसन कार्यालयाकडील प्रचलित झोपुप्रा नियमावली झोपडपट्टी अधिनियमानुसार प्रस्ताव राबविणेकामी नोंदणीकृत विकसकामार्फत प्रस्ताव दाखल करुन घेताना खाजगी / सार्वजनिक मालकीच्या मिळकतीवरील यापूर्वी घोषित नसलेलया क्षेत्रावर प्रस्ताव प्राप्त झालेस झोपडपट्टी सदृश्य परिस्थितीबाबतचा निर्णय करणेसाठीची कार्यपद्धती निश्चित करणेत आलेली आहे.

सदर कार्यपद्धतीत या कार्यालयाकडील सर्व्हेअर, उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी व सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडून स्थळ पाहणी अहवाल घेणेत येत होता. परंतू प्रशासकीय कारणास्तव श्री.रा.म.पवार, प्र.सहाय्यक संचालक नगर रचना यांचेऐवजी श्रीमती विजया पांगारकर, उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी व श्री. पी.एन.पवार, उपअभियंता यांनी कामकाज पहावे. झोपडपट्टी सदृश्य परिस्थितीबाबतचा निर्णय करणेसाठी या कार्यालयाकडील सर्व्हेअर श्री. तोडरमल, श्रीमती विजया पांगारकर, उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, श्री. सुरेश जाधव उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी व श्री. पी.एन.पवार, उपअभियंता यांनी स्थळपाहणी करुन अहवालासोबत सदर जागेचे २००० सालापासूनचे गुगल नकाशा तसेच झोपडपट्टी क्षेत्राचा सदृश्य भाग मोजणी नकाशात वेगळया रंगाने दर्शवावा जेणेकरुन नेमके क्षेत्र समजून येईल. या व्यतिरिक्त संदर्भाधीन परिपत्रकातील उर्वरित बाबी या कायम ठेवणेत येत आहेत.

सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

प्रत:-

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे.
२. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा, पुणे (श्री. सुरेश जाधव/श्रीमती विजया पांगारकर)
३. प्र.सहाय्यक संचालक नगर रचना, झोपुप्रा, पुणे (श्री.रा.म.पवार)
४. तहसिलदार, झोपुप्रा, पुणे (श्रीमती गीता गायकवाड/श्रीमती राधिका बारटक्के)
५. उप अभियंता, झोपुप्रा, पुणे (श्री.शेख/श्री.पवार)
६. कनिष्ठ अभियंता, झोपुप्रा, पुणे (श्री. जतकर)
७. सर्व्हेअर झोपुप्रा, पुणे (श्री. तोडरमल.)
८. प्रशा/आस्था/लेखा/तांत्रिक/ताबा/अपिल/कायदा सल्लागार.